**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व नियम २००६ अन्वये "संरक्षण अधिकारी" घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र राज्य**
**महिला व बाल विकास विभाग**
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२००६/प्र.क्र.२९५/का-२,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ मे, २००७.

वाचा :-१. केंद्र शासनाचे क्र. असाधारण, भाग-२, खंड-१, दि.१४.९.२००५ चे राजपत्र.
२. केंद्र शासनाची क्र. असाधारण, भाग-२, खंड-३. उपखंड (ll), दि.१७.१०.२००६ ची अधिसूचना
३. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक:- संकीर्ण-२००६/प्रक्र.२९५/का.२. दि.२१.१२.२००६.

**प्रस्तावना :-** कोटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम, २००६ हा जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण देशात दि.२६ ऑक्टोबर, २००६ पासून अंमल्लात आलेला आहे. सदर कायद्याचा कलम ८(१) अन्वये राज्य शासनाने प्रत्येक जिल्हयात गरजेप्रमाणे संरक्षण अधिकारी (Protection Officer) यांच्या नेमणूका करावयाच्या आहेत. या कायद्याअंतर्गत पीडित महिला व दंडाधिकारी (मॅजिस्ट्रेट) यांच्या मधील महत्वाचा दुवा म्हणून संरक्षण अधिकारी असतील. संरक्षण अधिकारी हा या कायद्यातील अत्यंत महत्वाचा घटक असल्याने या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता या विभागामार्फत संरक्षण अधिकारी तातडीने नेमण्याची कार्यवाही सत्वर होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वरील कायद्याअंतर्गत संरक्षण अधिकारी नेमणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) नुसार महिला व बाल विकास विभाग, महसूल व वन विभाग व ग्राम विकास विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या राज्यातील सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, प्रांत अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, गटविकास अधिकारी य विस्तार अधिकारी यांना पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात संरक्षण अधिकारी (Protection Officer) म्हणून घोषित करण्यात येत आहे. संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्ये, कार्य, जबाबदाऱ्या इत्यादी वरिल अधिनियम व नियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे रहातील.

२. राज्यातील सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, प्रांत अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी त्यांच्याकडे सद्या असेलेली कामे सांभाळून या शासन निणर्यानुसार सोपविण्यात आलेल्या संरक्षण अधिकाऱ्यांची कामे सांभाळावीत. तसेच त्यांच्याकडे असलेल्या मुळ पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी उपलब्ध असलेल्या कार्यालयीन जागा, आवश्यक साधनसामुग्री व इतर सुविधा यामधून संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्ये, कार्ये व जबाबदा-या पार पाडाव्यात.

३. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयामधील दाखल झालेल्या तक्रार अर्जाची एकत्रित माहितीची आकडेवारी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना दर महिन्याच्या ५ तारखे पर्यंत पाठवावी. तसेच अयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालब, पुणे यांनी सर्व जिल्हयांची माहिती संकलीत करुन शासनास दर महिन्याच्या १० तारखे पर्यंत पाठवावी.

४. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी संरक्षण अधिकाऱ्यांना त्यांची भूमिका व कर्तव्यांबाबत माहिती व प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करावी.

५. सदर अधिनियम व नियम महिला व बाल विकास मंत्रालय, नत्री दिल्ली यांच्या वेबसाईट www.wcd.nic.in वर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

स्वा./-
(श. पा. वारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा. उप मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालयं, मुंबई.

मा. मंत्रो, महसूल विभाग, यांचे खाजगी सचिव.

मा. मंत्री, ग्राम विकास विभाग, यांचे खाजगी सचिव.

मा. मंत्री, महिला व बाल विकास विभाग, यांचे खाजगी सचिव.

मा. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

ना. मुख्य सचिव, महाराष्ट्र सरकार, मंत्रालय, मुंबई.

अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-प्रधान सचिव.

ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

पोलिस महासंचालक, पोलिस मुख्यालय, मुंबई.

सर्व जिल्हाधिकारी.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,

सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई.

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय. महाराष्ट्र राज्य, पुणे.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उपमहानिरिक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष, पोलीस मुख्यालय, मुंबई.

सर्व निबंधक, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद (पत्राने).

सर्व जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय (पत्राने).

सर्व मंत्रालयीन विभाग.

सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी.

सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.

सर्व प्रांत अधिकारी.

सर्व तहसिलदार.

सर्व नायब तहसिलदार.

सर्व गट विकास अधिकारी.

सर्व विस्तार अधिकारी.

सर्व उपसचिव अवर सचिव/ कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, का.२.

*****